# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१७/१०/९३४८
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : directormfs@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : ०५ ऑक्टोबर,२०१७.

## : परिपत्रक :

विषय : दिवा प्रज्वलित करुन हवेत सोडण्यात येणा-या आकाश कंदिले (Flying Lantern) उडविण्यावर, विक्रीवर व साठा करणा-यांवर बंदी घालण्याबाबत.

राज्यात विविध ठिकाणी विशेषत: मकर संक्रांतीच्या, दिवाळीच्या काळात व काही वेळा इतर प्रसंगी दिवा प्रज्वलित करुन आकाशात कंदिल (Flying Lantern) मोठया प्रमाणात हवेत सोडले जातात. विमान वाहतुक, उतुंग इमारती, झोपडया, हिंदुस्थात पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम सारखे मोठे कारखाने तसेच मुंबई शहरात असलेले आरे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान सारखी वने तसेच राज्यातील अन्य जंगलसंपत्ती, शेती, नागरी वसाहती तसेच औद्योगिक वसाहती, इत्यादींवर अशी कंदिले पडून किंवा अडकून मोठी दुर्घटना होऊ शकते, त्यामुळे मोठया प्रमाणात जिवित व वित्तीहानी होण्याची शक्यता असते. तसेच अशा प्रकारच्या आकाश कंदिलांचा वापर दहशतवादी कृत्य करण्याकरीताही होण्याची शक्यता आहे.

०२. दिनांक १७ जानेवारी,२०१५ रोजी अशा प्रकारचा आकाश कंदिल हा बांधकाम चालू असलेल्या ओमकार एल्टा मॉल, इमारत क्रमांक सी, पश्चिम द्रुतगती महामार्ग, कुरार व्हिलेज, मालाड-पूर्व, मुंबई या इमारतीवरील तीन माळयांवर अडकून बांधकामासाठी वारपण्यात येणा-या पराती, लाकडी फळया व इतर बांधकाम साहित्य यांना मोठी आग लागली होती. अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये किंवा आकाश कंदिलाच्या सहाय्याने दहशतवादी कृत्य होऊ नये यासाठी आकाश कंदिलांवर संपूर्ण राज्यात बंदी आणणे आवश्यक आहे. जगातील काही देशांनी जसे अमेरिका, थायलंड या देशांनी बंदी घातली असून नॅशनल फायर प्रोटेक्शन असोसिएशन (National Fire Protection Association) यांनी सुध्दा अशा प्रकारच्या दिवा प्रज्वलित करुन हवेत सोडण्यात येणा-या आकाश कंदिलांवर बंदी घालण्याविषयी समर्थन केले आहे.

०३. पोलीस उपायुक्त (ऑपरेशनल) आणि कार्यकारी दंडाधिकारी, बृहन्मुंबई पोलीस यांनी बृहन्मुंबई शहरासाठी आकाश कंदिलाबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. याचधर्तीवर संपूर्ण राज्यात आकाश कंदिले विक्री करणा-यांवर, उडविणा-यांवर व विक्रीसाठी साठा करणा-यांवर बंदी आणण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात आवश्यक ती उपायोजना करण्यात यावी.

०४.		या परिपत्रकाद्वारे आपणांस सुचित करण्यात येत आहे की, आपल्या कार्यक्षेत्रात अशा प्रकारची आकाश कंदिले (Flying Lantern) विक्री करणे, उडविणे तसेच विक्रीसाठी साठा करणे यावर संपूर्ण राज्यात बंदी घालण्यात यावी. असे करताना आढळून आल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अथवा दंडात्मक कारवाई करण्याबाबत राज्यात संबंधीतांना कृपया सुचना द्याव्यात ही विनंती.

DIRECTORATE, MAHARASHTRA FIRE SERVICE
GOVERNMENT OF MAHARASHTRA

5/10/17

(प्र.सु.रहांगदळे)
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रत :
१. मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, मुंबई-४०० ००१.
३. मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, पोलीस आयुक्तालय, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधरी, मुंबई ४०० ०९३.
५. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०.
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हाधिकारी.
८. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
९. मुख्याधिकारी सर्व नगर परिषदा / नगर पंचायती.
१०. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे मुख्य अग्निशमन अधिकारी व प्रभारी अग्निशमन अधिकारी.